सकाळ

सोमवार,
३ सप्टेंबर २०१८

# किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सव उद्यापासून

## अच्युत गोडबोले यांच्या हस्ते गुरुवारी पुरस्कारांचे वितरण

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. २ : किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव मंगळवार (ता. ४)पासून सुरू होईल. 'प्रदूषण टाळा- नदी वाचवा' संकल्पनेवर आधारित हा महोत्सव असेल. गुरुवारी (ता. ६) एकलहरे वीजनिर्मिती केंद्रप्रमुख उमाकांत निखारे यांना वसुंधरा सन्मान पुरस्काराने लेखक अच्युत गोडबोले यांच्या हस्ते गौरविले जाईल. महोत्सवांतर्गत विविध महाविद्यालयांत लघुपटांचे प्रदर्शन, परिसंवाद, चित्रप्रदर्शन व व्याख्याने होतील, अशी माहिती किर्लोस्कर



उमाकांत निखारे



शिवानी गणेश



संग्राम गोवर्धने

समूहाचे जगदीश गदगे यांनी रविवारी (ता. २) पत्रकार परिषदेत दिली.

योगेश एकबोटे, निखिल चामणीकर आदी उपस्थित होते. श्री. गदगे म्हणाले, की वन्यजीव छायाचित्रकार संग्राम गोवर्धने व पर्यावरण विषय माध्यमातून मांडणाऱ्या पत्रकार शिवानी गणेश यांना 'वसुंधरामित्र' पुरस्कार दिला जाईल. पुरस्कार वितरण गुरुवारी (ता. ६) सायंकाळी सहाला गंगापूर रोडवरील कुसुमाग्रज स्मारकात होईल. यानिमित्त श्री. गोडबोले यांचे 'चंगळवाद आणि पर्यावरण' या विषयावर व्याख्यान होईल. कार्यक्रमास किर्लोस्कर लार्ज इंजिनचे शीतल कोठारी उपस्थित राहतील.

**महोत्सव थेट महाविद्यालयात**

कुसुमाग्रज फिल्म सोसायटीचे हेमंत बेळे म्हणाले, की महोत्सवात विविध पन्नास लघुपट दाखविले जातील. मंगळवारी (ता. ४) दुपारी दोनला गुरू गोविंदसिंग महाविद्यालयात महोत्सवाला सुरवात होईल. शैलजा देशपांडे उपस्थित राहतील. महोत्सवात लघुपट थेट महाविद्यालयात दाखविले जातील. मेट भुजबळ नॉलेज सिटीत छायाचित्र प्रदर्शन, आनंदनिकेतन शाळेत चर्चासत्र, लोकनेते गोपीनाथ मुंडे अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यशाळा, आयडिया आर्किटेक्चर महाविद्यालयात डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांचे व्याख्यान होईल.

### लघुपट पाहण्याची संधी

**महोत्सवात 'प्रदूषण टाळा, नदी वाचवा' संकल्पनेवर आधारित माहितीपट-लघुपट दाखविले जाणार आहेत. त्यात 'द टायगर व्हू क्रॉस्ड द लाइन', 'वॉटर अॅब्युनडन्स बाय कॉमन सेन्स', 'बाँडिंग विथ वर्डस्', 'ह्युडोसनियन गॉडवीट', 'रेसिलिइन्स फिश इगल्स ऑफ लेक नैवाशा', 'प्रोटेक्टिंग पॅराडाईज', 'यमुना-द मोस्ट पोल्युटेड रिव्हर' आदींचा समावेश असेल.**